# दैनिक अक्षराज

**अचूक वेध, अचूक बातमी**

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १४२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०३ जानेवारी २०२५







## प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करण्यासह नागरिकांना मुख्य प्रवाहात आणणार - मुख्यमंत्री फडणवीस



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, गडचिरोली :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पाठिंबा आणि मार्गदर्शन यामुळेच गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि आदिवासी भागांच्या विकासासाठी अथक प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर नमूद केले आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करून आदिवासी बांधवांचे जल, जमीन आणि जंगल हे हक्क अबाधित ठेवत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला. या बसमधून त्यांनी प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६ हजार २०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे श्री. फडणवीस यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे जवानांशी आणि ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत. गडचिरोली जिल्ह्याची ही विकासयात्रा यापुढेही सुरू राहील, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी येथील नागरिकांना दिला.

## वाकडमध्ये पान टपरीतून विकला जात होता गांजा पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पिंपरी- चिंचवड :** पिंपरी- चिंचवडमध्ये पान टपरीत गांजा विक्री करणाऱ्या पान टपरी चालकाला वाकड पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून पाच किलो शंभर ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. पुनीतकुमार विवेक शेट्टी असं अटक करण्यात आलेल्या गांजा विक्रेत्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नूतन वर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी अमली पदार्थ विक्रेत्यांवर करडी नजर ठेवली होती. नूतन वर्षाच्या पार्श्वभूमीवर अनेक जण नशा करतात हे पोलिसांना माहीत होतं. यामुळेच पुनीत कुमार हा त्याच्या साई श्री पान शॉप मधून गांजा विक्री करत असल्याची माहिती वाकड पोलिसांना मिळाली होती. याबाबत पोलिसांनी सविस्तर माहिती घेऊन खात्री करून छापा टाकला आणि गांजा विक्रेता पुनीतकुमारला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून पाच किलो शंभर ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात बेकायदेशीररित्या गांजा बाळगल्या प्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात एन.डी.पी.एस ॲक्ट कलम ८(क), २०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बलिदान भूमी सिद्धगड येथे हूतात्म्यांना मानवंदना !

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२, मुरबाड (ठाणे) :** १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ठाणे जिल्ह्यातील सिद्धगड येथिल जंगलात भुमिगत राहून ब्रिटिश सरकारला सळो की पळो करुन सोडणारे विठ्ठल (भाई) लक्ष्मण कोतवाल आणि त्यांच्या साथीदारांना तत्कालीन ब्रिटिश अधिकारी हाल यांनी मुरबाड तालुक्यातील सिद्धगडाच्या घळीत २ जानेवारी १९४३ ला पहाटे बेसावधपणे हल्ला केला.या हल्लयात क्रांतिवीर भाई कोतवाल व हिराजी पाटिल यांना विरमरण आले.या बलिदान भूमित २ जानेवारीच्या पहाटे अनेक वर्ष त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी हजारो देशभक्त येत असतात. आज सकाळी ६.१० मिनिटांनी स्मृतीस्थळी भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे ,आमदार किसन कथोरे, मा. आमदार गोटिराम पवार, प्रमोद हिंदूराव यांच्या हस्ते क्रांतीज्योत पेटवून शहिदांना अभिवादन केले.तर मुरबाड पोलीसांच्या वतिनेही मानवंदना देण्यात आली. यावेळी शेकडो शाळेय विद्यार्थी,देशभक्त नागरिक, शासकीय अधिकारी उपस्थित होते. १जानेवारीच्या रात्री सिद्धगड स्मारक समितिच्या वतीने वक्तृत्व, गायन, नाटक अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. यातील प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थांना मान्यवरांच्या बक्षिस देऊन गौरविण्यात आले.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षक योगेंद्र बांगर यांच्या सिद्धगडाच्या १२ लढाया या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तर माजी आमदार गोटिराम पवार यांनी सिद्धगडाकडे जाणारा रस्ता गेली अनेक वर्ष होऊ शकला नसल्याने खंत व्यक्त केली असता खासदार सुरेश म्हात्रे व स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी रस्त्याचे टेंडर निघाले असुन वन खात्याच्या परवानग्या मिळताच रस्ता लवकरच मार्गी लागेल असे आश्वासन दिले.यावेळी उपविभागीय अधिकारी श्री गुजर, पोलीस अधिकारी जगदिश शिंदे,तहसिलदार अभिजित देशमुख,गटविकास अधिकारी गायकवाड मॅडम तसेच ठाणे,पालघर आणि रायगड जिल्ह्यासह राज्यभरातील नाभिक बांधव आणि देशभक्त नागरिक व शाळेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २ मुलाच्या बापाचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, बुलडाणा :** संस्कृत भाषेत एक सुभाषित आहे,'वासना तुराम न भयम न लज्जा'. अर्थात वासनेच्या आहारी गेलेल्या व्यक्तीला ना लाज शरम राहते, ना आपल्या विकृतीचे भय राहते. वासनेच्या आहारी गेलेली माणसे कधी काय आणि कुणासोबत काय करतील याचा नेम नाही. यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ शकतात.

बुलढाणा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील डोणगाव पोलीस ठाणे हद्दीत एका वासनांध नराधमाचा असाच विकृत कारनामा समोर आला आहे. चक्क दोन मुलांचा बाप असलेल्या या नराधमाने अल्पवयीन मुलीला पळवून नेत तिच्यावर शारीरिक अत्याचार केला आहे. याप्रकरणी डोणगाव पोलीस ठाण्यात नराधमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेहकर तालुक्यातील डोणगाव पोलीस ठाण्याच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी हा वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथील राहणारा आहे. अमोल विजय लोखंडे असे या विकृत बुद्धीच्या नराधम आरोपीचे नाव आहे. पीडित अल्पवयीन मुलगी १७ वर्षांची असून डोणगाव परिसरातील राहिवासी आहे. आरोपीने ७ डिसेंबर रोजी फूस लावून आणि लग्नाचे आमिष दाखवून मुलीला पळवून नेले होते. त्याने मुलीला दूरवरच्या नाशिक येथे नेले, तिथे तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवत बलात्कार केला.



### आरोपीची शरणागती !

दरम्यान इकडे मुलीच्या कुटुंबीयांनी मुलीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. सगळीकडे शोधूनही मुलगी न सापडल्याने डोणगाव पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणात आधी अपहरणाचा गुन्हा दाखल करून मुलीचा शोध घेण्यासाठी पथके निर्माण केली. दरम्यान पोलीस मागावर असल्याची माहिती आरोपी अमोल याला मिळाली. त्यामुळे तो लपून छपून राहत होता.

अखेर ३१ डिसेंबरला तो स्वतःहून मुलीला घेऊन रिसोड तालुक्यातील शिरपूर पोलीस ठाण्यात दाखल झाला. ही माहिती डोणगाव पोलिसांना मिळाली. पोलिसांनी शिरपूर पोलिसांकडून अमोलला ताब्यात घेतले. यावेळी पीडित मुलीने आपल्या जबाबात आरोपी अमोलने लग्नाचे अमिष दाखवून बलात्कार केल्याचे सांगितले. त्यानंतर आधीच्या अपहरणाच्या गुन्ह्यात बाललैंगिक अत्याचाराचे कलम समाविष्ट करण्यात आले आहे. घटनेचा तपास डोणगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.


## घाटकोपर डकलाईन येथे एन विभागाच्या वस्ती स्वच्छता योजनेचे तीनतेरा

### वस्ती स्वच्छता योजना असतानाही डकलाईन येथे घाणीचे साम्राज्य !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, घाटकोपर (मुंबई) :** मुंबई महानगर पालिकेने परिसरातील नालेसफाई आणि स्वच्छता गृहाच्या देखभालीसाठी स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान अंतर्गत वस्ती स्वच्छता योजना जाहीर केली. झोपडपट्टीत साफसफाई, घराघरांतून कचऱ्याचे संकलन, छोटी गटारे, सार्वजनिक शौचालये आदींची स्वच्छता करण्याकरिता पालिकेतर्फे ही योजना राबविली जाते. यात लॉटरी पद्धतीने संस्थांची नियुक्ती करून संबंधित संस्थेला वस्ती स्वच्छता योजनेचे कंत्राट देऊन संस्थेला वस्तीच्या स्वच्छतेची जबाबदारी सोपविली जाते. यात पालिका संबंधित संस्थेला दरमहा मानधन अदा करते. संस्थांनी वस्तीच्या स्वच्छतेची सर्व कामे करून घ्यावी,असे या योजनेत अपेक्षित आहे.

मात्र मुंबई महानगर पालिकेच्या एन विभागातील घाटकोपर पश्चिम येथील डकलाईन येथे वस्ती स्वच्छता योजना असूनही संबंधित कंत्राटदाराकडून नालेसफाई, कचरा संकलन होत नसल्यामुळे येथील नाले तुंबून त्यातील सर्व घाणीचे पाणी, कचरा रस्त्यावर आल्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे



साम्राज्य पसरले असून या अस्वच्छतेमुळे स्थानिक नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. वारंवार याबाबत संबंधित विभागाला तक्रार करूनही हेतूरस्सर याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे नागरिकांची तक्रार आहे. तसेच नालेसफाई होत नसल्यामुळे, अस्वच्छतेमुळे येथील स्थानिक नागरिक, लहान मुले, वयोवृध्द व्यक्ती यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे याठिकाणी वस्ती स्वच्छ्ता योजनेचे तीनतेरा वाजले असून, मग ही योजना कोणासाठी आहे? नागरिकांसाठी की कंत्राटदारांना खुश करण्यासाठी असा सवाल येथील स्थानिक करत आहेत.

## बंदुकीचा परवाना मिळण्यासाठी सरपंचानेच गाडीवर हल्ला झाल्याचा केला बनाव

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०२, धाराशिव :** तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगा येथील सरपंचाने स्वतःला बंदुकीचे लायसन मिळण्यासाठी पवनचक्कीच्या गुंडांकडून आपल्या गाडीवर हल्ला झाल्याचा बनाव रचल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

गेल्या आठवड्यात म्हणजे २६ डिसेंबर रोजी रात्री १० वजेच्या सुमारास मेसाई जवळगा येथील सरपंच नामदेव निकम आणि त्यांचे मित्र प्रवीण इंगळे यांच्या गाडीवर हल्ला झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणात पोलिसांनी सखोल तपास केल्यानंतर सरपंचाने आणि त्यांच्या मित्राने स्वतःच हा बनाव केला असल्याचे उघड झाले आहे.



मस्साजोग प्रकरणानंतर राज्यात पवनचक्कीच्या गुंडांकडून गावकऱ्यांना त्रास दिला जात असल्याचा बातम्या प्रसिद्ध होत आहेत. त्यामुळे या संदर्भात राज्य शासन आणि पोलिस दल अलर्ट झाले आहे. तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगा येथे पवनचक्कीचे काम सुरू आहे.

काही दिवसांपासून पवनचक्कीच्या लोकांकडून शेतकऱ्यांना दमदाटी केला जात असल्याचा आरोप होत आहे. पवनचक्कीच्या गुंडांकडून स्कार्पिओ कार मध्ये बाऊन्सर्स आणून शेतकऱ्यांना दमदाटी केल्याचा व्हिडिओ समोर आला होता. त्यानंतर २६ डिसेंबर रोजी मेसाई जवळगा येथील सरपंच नामदेव निकम हे त्यांच्या कारमधून मित्रासमवेत पुण्यावरून गावी येत असताना रात्री दहा वाजेच्या सुमारास त्यांच्या गाडीच्या काचा फोडून अज्ञात लोकांनी पेट्रोल टाकून त्यांना जाळण्याचा प्रयत्न केला, अशा प्रकारची तक्रार त्यांनी तुळजापूर पोलीस स्टेशनला दिली होती.


त्यानुसार अज्ञात लोकांवर गुन्हाही दाखल झाला होता, मात्र पोलिसांनी सखोल चौकशी केल्यानंतर निकम आणि इंगळे या दोघांनी मिळून हा बनाव रचल्याचे उघड झाले असून वास्तविक पाहता त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचा हल्ला झाला नसून निकम यांना बंदुकीचे लायसन मिळण्यासाठी हा प्रकार केल्याचे समोर आले आहे.

या संदर्भात पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. त्यामुळे पवनचक्कीच्या लोकांवर खापर फोडण्याचा हा प्रकार संताप जनक असल्याचे बोलले जात आहे.

## राज्य क्रीडा दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात विविध क्रीडा उपक्रम राबविण्याचे आवाहन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, ठाणे :** ऑलिम्पिकमधील पहिले पदक विजेते कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा जन्म दिन १५ जानेवारी हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यान तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा विषयक चर्चासत्रे, नविन खेळांविपयक चर्चासत्रे, क्रीडा प्रदर्शन, क्रीडा विषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.



राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना करणे आणि जनतेत क्रीडाविषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी दि.१२ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात यावे.

तसेच महान क्रीडापटू दिवंगत मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी म्हणजेच दि.२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. याच धर्तीवर सन १९५२ मध्ये हेलसिंकी, फिनलँड येथील ऑलिंपिक स्पर्धेत स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक (कांस्य पदक) जिंकणाऱ्या महान कुस्तीपटू दिवंगत खाशाबा जाधव यांचे क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय योगदान विचारात घेता राज्यासोबतच देशाचा गौरव वाढविणाऱ्या कामगिरीस सातत्याने उजाळा मिळावा तसेच त्यातून राज्याच्या विद्यमान व नवीन खेळाडूंनी प्रेरणा घ्यावी यासाठी व त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा दरवर्षी राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असे निश्चित करण्यात आले आहे.

## संपादकीय



### सावित्रीमाई

महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची आज म्हणजे ३ जानेवारी २०२३ रोजी १९४ वि जयंती. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी साताऱ्याजवळील नायगाव या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव लक्ष्मीबाई तर वडिलांचे नाव खंडूजी नेवसे असे होते. त्यांचे वडील गावचे पाटील होते. ज्या काळात स्त्रियांना घराच्या बाहेर पडायचे बंधन होते, त्याकाळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. असे असले तरी सावित्रीबाई मात्र निडर स्वभावाच्या होत्या. त्या लहान असतांना एका दुबळ्या मुलाचे फुले पळवणाऱ्या धटिंगणाला त्यांनी अद्दल घडवली होती तसेच त्यांच्या घरासमोरील झाडावर असणाऱ्या घरट्यातील पक्षांची अंडी खाणाऱ्या नागाला त्यांनी ठेचून मारले होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महात्मा जोतीराव फुले यांच्याशी झाला. जोतीराव तेंव्हा तेरा वर्षाचे होते. त्याकाळी बालविवाहाची परंपरा होती, अगदी पाळण्यात देखील विवाह लावले जायचे. महात्मा जोतीराव फुले म्हणजे महाराष्ट्रातील आद्य समाजसुधारक. जोतीरावांना मातृप्रेम लाभले नाही. त्यांच्या मावस भगिनी सगुणा यांनी त्यांचा सांभाळ केला. सगुणा इंग्रज अधिकाऱ्याकडे दाई म्हणून काम करायच्या त्यामुळे त्यांना इंग्रजी कळायचे. आपल्या जोतीरावने देखील इंग्रजी फाडफाड बोलले पाहिजे असे त्यांना वाटायचे. त्यांनी जोतीरावांना शिकण्यास प्रेरित केले. जोतीरावही शिकले नंतर जोतिरावांनी सावित्रीबाई यांनाही शिकवले. मुलींच्या शिक्षणाचे महत्व जाणून मुलींसाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते नेहमी म्हणत एक मुलगी शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते म्हणून १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. या शाळेत सावित्रीबाई फुले मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. या शाळेत सुरवातीला दोन मुली होत्या वर्षअखेर या शाळेतील मुलींची संख्या ४० ते ४५ पर्यंत पोहचली. या शाळेमुळे शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्री वर्गास ज्ञानाची कवाडे खुली झाली. पण हे चांगले काम त्याकाळातील सनातनी वर्गास रुचले नाही. मुली शाळेसाठी घराबाहेर पडू लागल्याने धर्म बुडाला अशी आरोळी ठोकत या सनातनी लोकांनी सावित्रीबाई व जोतीरावांच्या या महान कार्यास विरोध केला. सावित्रीबाई फुले यांच्या अंगावर शेण गोळे फेकले. काहींनी तर अंगावर हात टाकण्याचाही प्रयत्न केला पण फुले दांपत्य डगमगले नाही. घेतलेला वसा त्यांनी सोडला नाही. कितीही विरोध झाला तरी ध्येयापासून ते विचलित झाले नाही. जिद्दी व ध्येयवादी फुले दांपत्यांनी ज्ञानदानाचे आपले पवित्र कार्य चालूच ठेवले. जोतिरावांनी काढलेल्या शाळेत फुले दांपत्य व अन्य शिक्षक जीव ओतून शिकवत. विद्यार्थ्यांशी ते एकरूप होत त्यामुळे त्यांच्या शाळेची प्रगती लक्षणीय होती. त्यांच्या शाळेविषयी पुणे ऑब्जर्व्हर या दैनिकामध्ये २१ मे १८५२ मध्ये लिहिले होते, जोतीराव फुलेंच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा दहा पटीने जास्त आहे कारण या शाळेत मुलींना शिकवण्याची जी व्यवस्था आहे ती मुलांच्या शासकीय शाळेपेक्षा चांगली आहे. १८६३ मध्ये फुले दांपत्यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीबाई त्याच्या प्रमुख होत्या. १८८५ पर्यंत ३५ विधवा ब्राह्मण स्त्रिया त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवा त्यांच्या घरात आल्या. या काशीबाईच्या मुलाला त्यांनी दत्तक घेतले त्या मुलाचे नाव यशवंत ठेवले. यशवंतला शिकवून त्यांनी डॉक्टर बनवले. सण १८७७ साली महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला. या दुष्काळात फुले दांपत्यांनी लोकांना खूप मदत केली. त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी जेवणाखाण्याची सोय केली. सावित्रीबाईंनी केशवपन पद्धत बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करुन नाभिकांचा संप घडवून आणला. पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महात्मा फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली. सावित्रीबाई फुले या मोठ्या साहित्यिकही होत्या. काव्यफुले व बावनकशी सुबोध रत्नाकर हे काव्यसंग्रह त्यांनी लिहिले. १८९६-९७ साली पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला होता. प्लेग या जीवघेण्या आजाराने अनेकांचा जीव घेतला. हा रोग संसर्गजन्य आहे हे माहीत असूनही सावित्रीबाईंनी प्लेग पीडितांसाठी पुण्याजवळ दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांची सेवा करु लागल्या. त्यांना आधार देऊ लागल्या. प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंनाही प्लेगची लागण झाली त्यातून १० मार्च १८९७ रोजी त्यांचे निधन झाले. सावित्रीबाई फुले यांचे कार्य समस्त मानवजातीला भूषणावह आहे म्हणूनच जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# सावित्रीमाई आणि महिला मुक्तीमंत्र!

सावित्रीमाई फुले यांचा जन्म आजच्या दिवशी म्हणजेच दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवसे- पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

**विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।**
**तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन।।**

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षाच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वत: शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे।।



**– संकलन व सुलेखन –**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे।।
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

**काळरात्र गेली। अज्ञान पळाले।।**
**सर्वे जागे केले। सूर्याने या।।**
**शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य।।**
**तेजस्वी अपूर्व। उगवला।।**

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणार अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

**स्वामी जोतीबांच्या लागे मी चरणी!**
**त्यांची गोड वाणी मनी घुमे!!**
**महार मांगाची करते मी सेवा!**
**आवडीच्या देवा स्मरूनिया!!**

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राम्हण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

**बंदी मनुची विद्या घेण्या होती ती उठली।।**
**ज्ञानदाते इंग्रज आले विद्या शिकूनी घ्या रे।।**
**ऐसी संधी आली नव्हती हजार वर्षे रे।।**
**मुलाबाळांना आपण शिकवू आपणही शिकू।।**
**विद्या घेऊनी ज्ञान वाढवून नीतीधर्म शिकू।।**
**नसानसातून ईर्षा खेळवू विद्या मी घेईन।।**
**शूद्रत्वाचा डाग हा माझा निपटून काढीन।।**
**राज्यात बळीच्या आम्हास विद्या घडो।।**
**यशाची आमच्या दुंदभी नगारे झडो।।**
**'इडा पिडा टळो' या कार्यी भट न पडो।।**
**असे गर्जूनी विद्या शिकण्या जागे होऊन झटा।।**
**परंपरेच्या बेड्या तोडुनी शिकण्यासाठी उठ।।**

काव्यफुलेच्या माध्यमातून रंजल्या-गांजलेल्या दलित-पीडित समाजाला शिक्षणामृत पाजणाऱ्या राष्ट्रपितामह क्रांतीबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांचे विचारधन हीच आपली संपत्ती नव्हे का?

प्लेगने बाधीत रुग्णांची सेवा करताना सावित्रीमाईंनाच प्लेगची लागण झाली. दि.१० मार्च १८९७ रोजी त्या निर्मिकांकी कायमच्या निद्रिस्त झाल्या.

**!! जयंती निमित्त सावित्रीमाईंस व त्यांच्या जनोद्धारक कार्यास विनम्र अभिवादन !!**

## उज्जैनकर फाउंडेशनच्या आळंदी संमेलनाची पत्रकार परिषद संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, आळंदी :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर ता.मुक्ताईनगर जिल्हा जळगाव आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आणि श्री ज्ञानेश्वर चरित्र समिती व श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था आळंदी देवाची यांच्या सौजन्याने दिनांक ४ जानेवारी २०२५ वार शनिवारला तिसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनाचे मोरया मंगल कार्यालय, नवीन पुलाजवळ आळंदी देवाची येथे आयोजित करण्यात आलेले आहे. त्या संदर्भातील पत्रकार परिषदेचे आयोजन नुकतेच आराधना हॉटेल या ठिकाणी करण्यात आले. याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर, फाउंडेशनचे राज्य अध्यक्ष प्रा. डॉ. सुभाष बागल, श्री ज्ञानेश्वर चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर व संमेलनाचे निमंत्रक तथा श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे खजिनदार डॉ.ज्ञानेश्वर पाटील आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी या संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा फाउंडेशनचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुरेंद्र हेरकळ यांनी संमेलनाची पत्रिका वाचून दाखवली. तर आदिशक्ती मुक्ताई कडून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना ७५० व्या जयंती महोत्सवी वर्षानिमित्त ७५० फुटाची व १०१ किलो वजनाची राखी बांधण्यात येणार असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले. या राखीची नोंद गिनीज वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड व लिमका बुक मध्ये करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले त्यानंतर यासंबंधीचे संमेलनाचे मुख्य आयोजक तथा उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी उज्जैनकर फाउंडेशनचे गेल्या १५ वर्षातील कार्याचा आढावा दिला व हे संमेलन पुण्यनगरी आळंदी येथे होत असल्याने आदिशक्ती संत मुक्ताईच्या पावन भूमीतून मराठी भाषा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य सुरू असून महाराष्ट्रात विविध जिल्ह्यामध्ये आणि गोवा राज्यामध्ये सुद्धा फाउंडेशनचे संमेलन यशस्वी करण्यात आलेले आहे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यभूमीमध्ये साहित्य नगरीमध्ये हे संमेलन आयोजित असल्याने उज्जैनकर यांनी आळंदीकर वासियांचे ऋण व्यक्त केले याप्रसंगी उपस्थित पत्रकार बंधूंना मान्यवरांनी संमेलनाच्या संदर्भामध्ये आणि उज्जैनकर फाउंडेशनच्या संदर्भात माहिती दिली व सर्व सन्माननीय पत्रकार बंधूंचे मुक्ताईचे चरित्र पुस्तक, मुक्ताईची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. सकाळी साडेसात ते रात्री दहा वाजेपर्यंत आयोजित या संमेलनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थिती देण्याविषयी आवाहन करण्यात आले याप्रसंगी फाउंडेशनचे राज्य सल्लागार तसेच संमेलनाचे सहकार्याध्यक्ष रामचंद्र कुऱ्हाडे पाटील संमेलनाच्या निमंत्रक फाउंडेशनच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षा रुपालीताई चिंचोलीकर पुणे जिल्हा उपाध्यक्ष जगन्नाथ बुडूखले पश्चिम महाराष्ट्र विभागीय सचिव पुणे येथील श्रीरामचंद्र गुरव जळगाव जिल्हा उपाध्यक्ष श्री मधुकर पोतदार साहेब विदर्भ विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहरराव पवार बुलढाणा जिल्हा सदस्य डॉ. निवृत्तीभाऊ जाधव आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सावित्रीबाई..

भिडेवाड्यात आता
होईलराष्ट्रीयस्मारक
सावित्रीबाईंचे कार्य
पिढ्यास उर्जाप्रेरक

शिक्षण ज्योत लावी
समाजास उपकारक
महिलाकेली शिक्षीत
अवघ्या घरा तारक

पहिलीमहिला शाळा
धोरण असे उध्दारक
जनसेवा मनगटावरी
बांधला सबल दोरक

सदैव सोसला संघर्ष
वाटे कैक गतिरोधक
अज्ञानअंधार घालवे
निर्मीला सत्यशोधक

पाऊलखुणा पाहता
उत्सुक हो संशोधक
जाणता फुलेदांपत्या
दिसे दिशा उद्बोधक

सावित्रीमाईचे स्मरण
इतिहासां मार्ग दर्शक
लेखणी लढा जाणता
अंचबीत होती दर्शक

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## महाकुंभावरही दहशतवादाचे सावट

**विश्वातील सर्वांत प्राचीन संस्कृती लाभलेला देश म्हणजे भारत. जगातील अनेक संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाल्या, भारतावरही आजतागायत अनेक परकीय आक्रमणे झाली; मात्र त्यातूनही या देशाची संस्कृती टिकून आहे.** सनातन वैदिक हिंदू धर्माला लक्षावधी वर्षांचा इतिहास आहे. त्याची पाळेमुळे येथील मातीत घट्ट रुतलेली आहेत, त्याच्या संस्कृतीच्या खुणा आजही या भूमीत अबाधित आहेत. १९४७ साली धर्माच्या आधारावर देशाची फाळणी झाली. तरीही या देशाने पंथनिरपेक्ष शासनप्रणाली स्वीकारली. बहुसंख्य हिंदू असूनही या देशात अन्य पंथीय सर्वाधिक सुरक्षित जीवन जगत आहेत. सरकारने त्यांना विशेष सवलती आणि संरक्षण पुरवले आहे.त्याच्यासाठी स्वतंत्र कायदे आहेत. त्यांचे सण, उत्सव ते येथे गुण्यागोविंदाने साजरे करत आहेत. येथील हिंदूसुद्धा त्यांच्या सुख दुःखात नेहमीच आनंदाने सहभागी होत असतात. अल्पसंख्याकांच्या एखाद्या उत्सवाला येथील बहुसंख्यांकांमुळे गालबोट लागले अशा स्वरूपाच्या घटना घडल्याचे आजतागायत ऐकिवात नाही. याउलट गेल्या काही वर्षातील घटनांचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते कि हिंदूंचे सण किंवा उत्सव जवळ आले की हिंदूंवर हल्ले करण्याच्या धमक्या दहशतवाद्यांकडून दिल्या जातात. इतकेच नव्हे तर देशात अनेक ठिकाणी श्रीरामनवमी, हनुमानजयंती, शिवजयंती, गणेशोत्सव यांसारख्या उत्सवांत आणि या उत्सवांच्या मिरवणुकांवर दगडफेक होते, हल्ले होतात. आता तर थेट महाकुंभावर हल्ला करण्याची धमकी मिळाली आहे.

महाकुंभ हे हिंदू धर्मतील सर्वात मोठे पर्व आहे. यंदा प्रयागराज या ठिकाणी हा महासोहळा साजरा होत आहे. महाकुंभात स्नान करण्यासाठी आणि कुंभपर्वातील चैतन्य अनुभवण्यासाठी देश विदेशातून विविध, संत-महंत, साधू-संन्यासी यांसह ५० कोटीहून अधिक हिंदू भक्तगण येणार आहेत. प्रशासनाकडून त्यासाठी केली जाणारी सर्व सिद्धता आता अंतिम टप्यात आली आहे. स्वतः मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ या पर्वाचा सिद्धतेत गुंतले आहेत. अशात 'एक्स' या सामाजिक माध्यमावर नसर पठाण नावाच्या आयडीवरून महाकुंभात हल्ला करण्याची धमकी देण्यात आली आहे. 'तुम्ही सर्व गुन्हेगार आहात, महाकुंभात बॉम्बस्फोट करणार, १००० हिंदूंना मारणार, अल्ला इज ग्रेट' अशा स्वरूपाचा संदेश 'एक्स' प्लॅटफॉर्मवर दिसल्यावर विपीन गौर नावाच्या तरुणाने पोलिसांना टॅग करून ही पोस्ट रिट्विट केली आणि या धमकीचा स्क्रिनशॉट शेअर केला.

ज्याने ही धमकी ट्विट केली त्या नसरचा शोध पोलीस यंत्रणा घेत आहे. नसरच्या बायोमध्ये त्याने मी कट्टर मुस्लिम असून मला मुस्लिम असल्याचा अभिमान असल्याचे लिहिले आहे. सायबर पोलीस त्यादृष्टीने कामाला लागले असून हे ट्विट करणारा लवकरच गजाआड दिसेल यात शंका नाही; मात्र हे धाडस या धमकी देणाऱ्यांमध्ये येते तरी कुठून ? अमरनाथ यात्रा असो वा वैष्णवदेवीची यात्रा असो अशा ठिकाणीही अशा स्वरूपाच्या धमक्या येतात. अमरनाथ यात्रेमध्ये तर दहशतवाद्यांकडून प्रत्यक्षातही हल्ले केले जातात. भारतीय सैनिकांकडून त्यास सडेतोड उत्तर दिले जाते. दहशतवाद्यांकडून दिल्या जाणाऱ्या धमक्या केवळ हिंदूंच्या उत्सवांत, यात्रांमध्येच का येतात ? या धमक्या देणारे एका विशिष्ट पंथांचेच का असतात ? त्यांच्यात ही धार्मिक कट्टरता कोण निर्माण करतो ? आपला धर्मच श्रेष्ठ असून अन्य धर्मियांवर हल्ले करा, त्यांना ठार करा, त्यांच्या उत्सवांत विघ्न आणा ही शिकवण कोण यांना देतो ? दहशतवादाला धर्म नसतो हे जरी सत्य असले तरी दहशतवादाचे चटके या देशात केवळ हिंदूंनाच का सहन करावे लागतात ?

हिंदूंच्या सण-उत्सवांसह स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या राष्ट्रीय सणांच्या पार्श्वभूमीवर बॉम्बस्फोट करण्याच्या, दहशतवादी हल्ले करण्याच्या धमक्या मिळत असतात. आजतागायत या देशात अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत ज्यामध्ये लक्षावधी निरपराध नागरिक मारले गेले आहेत. या निरपराध्यांचे रक्त सांडून, त्यांचे जीव घेऊन या दहशतवाद्यांना नक्की काय साध्य करायचे असते ? या धमकी देणाऱ्यांना, हल्ले करणाऱ्यांना मृत्यूचेही भय का नसते ? त्यांच्यात हें कौर्य कोण निर्माण करते ? दहशतवाद ही केवळ भारताची समस्या नसून आजमितीला ती जगभराची डोकेदुखी बनली आहे.

दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी जगभरातील तपस यंत्रणा कार्य करत आहेत. अनेक देशांनी या दशतवादाला देशातून हद्दपार करण्यात यशही मिळवले आहे. त्यासाठी त्यांनी देशस्तरावर काही कठोर निर्णय घेऊन धर्मांधतेवर बंधने घातली आहेत. धार्मिक कट्टरतावाद निर्माण करणाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. दशहतवादी मग तो अन्य देशात लपून बसलेला का असेना त्याच्या गोटात शिरून त्याला ठार केले आहे. भारत अशा प्रकारच्या कारवाया केव्हा करणार ? राष्ट्रीय सण, हिंदूंचे उत्सव, महाकुंभ आणखी किती वर्ष दहशतवादाच्या सावटाखाली साजरे होणार ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## भगवान महादेव सांबरे क्रिस्टल केअर रुग्णालयाचे उद्घाटन



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०२, शहापूर (ठाणे) :** गुरुवार, दिनांक ०२ जानेवारी २०२५ रोजी शहापूर मध्ये भगवान महादेव सांबरे क्रिस्टल केअर रुग्णालयाचे उद्घाटन जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष निलेश सांबरे व मुरबाडचे आमदार किसन कथोरे, पद्मश्री डॉक्टर तात्याराव लहाने, न्यूज १८ लोकमतचे संपादक मंदार, योगी फुलनाथ बाबा, सद्गुरू अलोकजी महाराज, निलेश सांबरेचे वडील भगवान सांबरे व आई भावना सांबरे यांच्या हस्ते झाला. शहापूर तालुका हा पूर्ण आदिवासी तालुका असून मोठ्या प्रमाणत आदिवासी व बहुजन समाजाला उपचाऱ्यासाठी मुंबई सारख्या शहरात मोठ्या रुग्णालयात जने शक्य होत नाही. यासाठी जिजाऊ संघटनेचे संस्थापक नीलेशजी सांबरे यांनी शहापूर याठिकाणी भगवान महादेव सांबरे क्रिस्टल केअर रुग्णालयाचे मोफत उद्घाटन करण्यात आले. यामध्ये सर्वच आजारावर संपर्ण मोफत उपचार याठिकाणी होणार आहेत. किसन कथोरे यांनी माझी उठी जर निलेश संबरेनी लावली तर ते कुठेही कमी पडणार नाही व मला सेवा करन्याची संधी मिळेल असेही सांगितले. यावेळी क्रिस्टल केअरचे डॉक्टर अमोल गीते, उपविभागीय अधिकारी मिलिंद शिंदे, किसन बोंद्रे, भांगरथ अनेक मान्यवर व जिजाऊ संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## रिक्षात गहाळ झालेले २२ तोळे सोनं तांत्रिक पद्धतीने शोधून पोलिसांनी केले परत





**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०२, डोंबिवली (ठाणे) :** दिनांक ०१ जानेवारी २०२५ रोजी नवीन वर्षाचा आनंद साजरा करताना एका कुटुंबीयांचे २२ तोळे सोनं रिक्षा गहाळ झाल्याची तक्रार रामनगर पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आली होती. मिळालेल्या माहिती नुसार रामनगर पोलीस ठाणे इथून अश्विनी अजय कृपेकर वय वर्षे ४४, राहणार डोंबिवली (पूर्व) एमआयडीसी येथून अश्विनी किपेकर, मानपाडा ते डोंबिवली रेल्वे स्टेशन रिक्षातून प्रवास करीत असताना त्यांच्या बॅगेतील २२ तोळे सोनं एकूण रुपये १८ लाख ५० हजार किमतीचे तसेच कपडे रिक्षामध्ये विसरल्या याबाबतची तक्रार रामनगर पोलीस ठाण्यामध्ये देण्यात आली होती.

प्रसंगी रामनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जावदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नवनाथ वाघमोडे पो.ह मंगेश वीर यांनी पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज द्वारे त्या रिक्षाचा नंबर शोध घेऊन व रिक्षा चालकाचा पत्ता शोधून तक्रारदाराचे २२ तोळे सोन्याचे दागिने व कपड्याची बॅग वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जावळे यांनी त्यांना परत मिळून दिली. तक्रारदारांनी डोंबिवली पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

## १० जानेवारी रोजी पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा

### कविता राणे, धर्मराज हल्लाळे यांची उपस्थिती

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.०२, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुका पत्रकार संघाच्या वतीने शुक्रवार, दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी पत्रकार पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. हा सोहळा शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता होणार असून सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी केले आहे. कळंब तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण सोहळ्याचे २६ वे वर्ष असून यासाठी एनडीटीव्ही मराठी मुंबईच्या असोसिएट एडिटर डॉक्टर कविता राणे, माध्यम व जनसंपर्क तज्ञ सचिन साळुंखे, प्रसिद्ध पत्रकार, लेखक धर्मराज हल्लाळे, धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रसेन देशमुख, राजकीय विश्लेषक अभय देशपांडे, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य डॉ. अशोक दादा मोहेकर हे उपस्थित राहणार आहेत. या दिवशी पुस्तक प्रकाशन, मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी केले आहे. विशाल परदेशी (मुंबई), चंद्रकांत करडे (बार्शी), सुभाष कुलकर्णी (तेर), मोहन तलकोकुल (सोलापूर), सुभाष घोडके (कळंब), शिवाजी सावंत (देव धानोरा), अनिल क्षीरसागर (इटकुर ) यांना पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे.

## मुदखेडमध्ये ०४ जानेवारी ला मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०२, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड नगरीत स्व.राजमनीबाई विश्वनाथराव गोडसे यांच्या ९ व्या स्मृतिदिनानिमित्त मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन दिनांक ०४ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले आहे. आरोग्य शिबिरात मधुमेह, रक्तदाब, नेत्ररोग रुग्णांची मोफत तपासणी तसेच विनाशुल्क चष्मे व औषधी वाटप करण्यात येणार असल्याची माहिती आयोजक काँग्रेसचे शहराध्यक्ष बालाजी गोडसे यांनी दिली आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी गोडसे परिवाराच्या वतीने स्वर्गीय राजमनीबाई यांच्या स्मृतिदिना निमित्त महारोग आरोग्य निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात मधुमेह, नेत्ररोग, अस्थिरोग तथा कान, नाक व घसा आदी तज्ञ वैद्यकांकडून तपासणी केली जाणार आहे. त्याचबरोबर आवश्यक असणाऱ्यां रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केली जाणार आहे. शहर व तालुक्यातील गरजू रुग्णांनी महा आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वनाथ गोडसे, बालाजी गोडसे, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, सिताराम गोडसे, नवनाथराव गोडसे, भगवानराव गोडसे, पंढरीनाथ गोडसे, सुरेश गोडसे, व्यंकटेश गोडसे, राजू गोडसे, गणेश गोडसे, नितीन गोडसे, सचिन गोडसे, सुमित गोडसे, साईनाथ गोडसे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रुग्णसेवेचे तालुक्यातील रुग्ण आणि नातेवाईक यांच्याकडून कौतुक

## हदगाव उपजिल्हा रुग्णालयाची सर्व शस्त्रक्रिया सुविधे बरोबरच रुचकर भोजनासह स्वच्छतेकडे वाटचाल






**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.०२, हदगाव (नांदेड) :** उपजिल्हा रुग्णालयाचे कर्तव्यदक्ष अधीक्षक डॉ. दरबस्तवार यांच्या नियोजन आणि शिस्तबद्ध मार्गदर्शनात कर्मचारी शेषराव चव्हाण, साळवे यांच्या देखरेखीखाली सागर चावरे, आयुबखान चाँद खान हे रुग्णालय स्वच्छ चकाचक ठेवीत असून राठोड, सावळे, दत्ता नेवरकर हे रुग्णालयात रुग्णसेवा करून डॉक्टर, सिस्टर, नर्स यांना मदत करताना दिसून येत असून गेल्या महिन्यात अनेक डोळ्यांच्या शस्त्रक्रिया बरोबरच कुटुंब नियोजन, डिलेव्हरी सिजर ह्या शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात पार पडल्याअसून हदगाव तालुक्यातील आणि शहरातीलअनेक रुग्ण अडमिट होत आहेत.

रुग्णालयातील ऍडमिट पेशंटला नाश्ता जेवणा संबंधी आमच्या प्रतिनिधीने विचारपूस केली असता ते म्हणाले की, रेखा देवानंद गिरबिडे, आणि गोदावरी गौतम धुळे ह्या महिला ऍडमिट रुग्णांना अनेक वर्षापासून वेळोवेळी पौष्टिक नाश्ता आणि रुचकर जेवण देऊन जनसेवा करीत असल्याचे रुग्णालयातील रुग्ण महिलांनी आमच्या प्रतिनिधीससांगितले असून हदगाव उपजिल्हा रुग्णालयाची सर्वशस्त्रक्रिया सुविधे बरोबरच रुचकर नाश्ता भोजनासह स्वच्छतेकडे वाटचाल चालू असून रुग्ण आणि नातेवाईक येथील रुग्णसेवेवर समाधानी असल्याचे तालुक्यातील जनतेत बोलल्या जात आहे.

# नववर्ष प्रारंभी महापालिका आयुक्तांनी केली कल्याण-डोंबिवली परिसरातील प्रकल्पांची पाहणी



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०२, डोंबिवली (ठाणे) :** महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी नववर्षाच्या प्रारंभ म्हणजेच दिनांक ०१ जानेवारी २०२५ रोजी दिवसभर कल्याण डोंबिवली सुरु असलेल्या प्रकल्पांची पाहणी केली. यात सुरुवातीला त्यांनी कल्याणमधील भवानी चौक ते विठ्ठलवाडी स्टेशन उन्नत मार्ग, शक्ती धाम रुग्णालय, काटेमानिवली जलकुंभ आणि तिसगाव जलकुंभ येथे संबंधित अधिका-यांसमवेत पाहणी केली. कल्याण (पूर्व) येथील आरक्षित इमारतीमध्ये (शक्तीधाम) ३० खाटांचे प्रसुतीगृह सुरु करण्यात आले असून सदर प्रसुतीगृह मे.वेस्टर्न हेल्थ केअर कन्सल्टंन्सी या बाह्य संस्थेमार्फत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स आणि इतर मनुष्यबळ वापरुन चालविण्यात येत आहे. सदर ठिकाणी सामान्य प्रसुती, सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती इ. प्रसुती विषयक सेवा मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच इतर स्त्रीरोग विषयक सेवा महापालिकेच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे. येथील बाह्यरुग्ण विभाग दि. ०२/१२/२०२४ पासून आणि आंतररुग्ण विभाग दि. ०९/१२/२०२४ पासून सुरु करण्यात आला आहे. महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी या प्रसुतीगृहास भेट देवून पाहणी केली व दाखल रुग्णांची विचारपूस केली तसेच बांधकाम विषयक कामे त्वरेने पूर्ण करणेबाबत संबंधित विभागाला निर्देश दिले. तसेच प्रसुतीगृहा बाहेर दर्शनी भागावर सुचनाफलक लावण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिका-यांना दिले.

केंद्र सरकार व राज्य सरकार पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली शहरात सुरु असलेल्या १० जलकुंभांच्या कामापैकी काटेमानिवली आणि तिसगाव येथील जलकुंभाच्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी करुन कामाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

सदर जलकुंभांची क्षमता प्रत्येकी १.७५ एमएलडी असून, ही कामे पूर्ण झाल्यावर चिंचपाडा, काटेमानिवली व तिसगाव येथील पाणी पुरवठा सुरळीत होणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी जुनी डोंबिवली येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी केली. सदर प्रकल्प महापालिकेच्या आरक्षित भुखंडावर उभारण्यात आला असून, तो प्रायोगिक तत्वावर चालू करण्यात आला आहे. तेथील पाहणी करतेवेळी तेथे उपस्थित असलेल्या स्थानिकांचे प्रश्न समजवून घेऊन महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी त्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली.

हा प्रकल्प डोंबिवलीसाठी महत्वाचा असून, कच-यावर प्रक्रिया करुन खत निर्मिती करण्यात येणार असून या प्रकल्पापासून स्थानिकांना आरोग्य विषयक कुठलाही धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता महापालिकेमार्फत घेण्यात येईल, असे त्यांनी आश्वासित केले.

तद्नंतर त्यांनी डोंबिवली येथील पत्रकार कक्षात पत्रकारांशी संवाद साधला. सध्या सुरु असलेल्या विकासकामातील अडथळे दूर होण्याच्या अनुषंगाने व प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीकोनातून आजचा पाहणी दौरा आयोजित केल्याबाबत माहिती त्यांनी उपस्थित पत्रकारांना दिली.

डोंबिवलीतील ९० टक्के रस्त्यांची कामे मंजूर असून, ती कामे सुरु आहेत. त्यामुळे डोंबिवलीकरांना लवकरच चांगले रस्ते उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे डोंबिवलीतील प्रामुख्याने डोंबिवली पूर्वेतील परिसर प्रभाग अधिका-यांच्या मदतीने फेरीवाला मुक्त करण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे, अशीही माहिती महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी यावेळी दिली.

तद्नंतर आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी खाडी किना-यावरील नेव्हल म्युझियमच्या कामाच्या पाहणी करत सदर काम शिघ्र गतीने करणे बाबत संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिकेचे उप आयुक्त व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत पुणे ग्रामीण कुमारी, तर ठाणे शहर कुमार गटाला विजेते पद





**अक्षराज : संदिप येवले**

**दि.०२ :** पुणे ग्रामीण आणि ठाणे शहर यांनी अनुक्रमे कुमारी व कुमार गटाचे विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने ५१व्या कुमार/कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते.

राज्य कबड्डी असो.चे उपाध्यक्ष माजी आमदार दिनकर तात्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगलीवाडी, सांगली येथील चिंचबाग मैदानावर झालेल्या कुमारीच्या अंतिम सामन्यात गत उपविजेत्या पुणे ग्रामीण संघाने गत विजेत्या पिंपरी चिंचवडचा प्रतिकार ३२-२५ असा मोडून काढत स्वर्गीय चंदन सखाराम पांडे फिरत्या चषकावर आपले नाव कोरले.

या विजयाने पुणे ग्रामीणने गत वर्षातील पराभवाची परतफेड केली. पूर्वार्धात पहिल्या ४ मिनिटात लोण देत ९-१ अशी आघाडी घेतली. पिंपरी चिंचवडने यातून सावरत लोणची परतफेड करीत ही आघाडी कमी केली. विश्रांतीला १८-१३ अशी पुणे ग्रामीण कडे आघाडी होती. विश्रांतीनंतर देखील सामन्यात चुरस पहावयास मिळाली. पण पुणे ग्रामीणने आपल्या हातून आघाडी निसटून दिली नाही. शेवटी ७ गुणांनी पुणे ग्रामीणने सामना जिंकला.

वैभवी जाधव, साक्षी रावडे यांच्या झंझावाती चढाया त्यांना प्रतिक्षा लांडगे, सृष्टी मोरे यांची मिळालेली पकडीची साथ यामुळेच हे शक्य झाले. पूजा तेलंग, रुपाली डोंगरे, भूमिका गोरे, वृषाली रोकडे यांचा खेळ पिंपरी चिंचवडला विजयी करण्यात थोडा कमी पडला. कुमार गटात ठाणे शहरने पुणे ग्रामीणचा कडवा प्रतिकार ३३-३१ असा पराभव करीत स्वर्गीय प्रभाकर नागो पाटील फिरता चषक आपल्या नावे केला. शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठावेधक ठरलेल्या या सामन्यात पूर्वार्धात २४-१० अशी आघाडी ठाणे संघाकडे होती.

उत्तरार्धात पुण्याने विजयासाठी ठाण्याने चांगलेच झुंजविले. शेवटची पाच मिनिटे पुकरली तेव्हा ३२-२६ अशी ठाण्याकडे आघाडी होती. आफताब मंसुरी, आदित्य पिलाने, रोहन टोपरे यांच्या चढाई पकडीच्या खेळाने ठाणे शहरने हा चषक उंचाविला. प्रणव बांगर, साहिल माने, रोहन टोपारे यांनी उत्तरार्धात कडवी लढत देत आघाडी कमी केली. पण संघाला विजयी करण्यात ते अयशस्वी ठरले.

या अगोदर झालेल्या मुलींच्या उपांत्य सामन्यात पिंपरी चिंचवड ने अहमद नगरला ३२-१७ असे तर पुणे ग्रामीण ने ठाणे शहराला ३६-२६ असे पराभूत करीत अंतिम फेरीत धडक दिली. मुलांच्या सामन्यात पुणे ग्रामीण ने सांगलीला ३२-१७ असे, तर ठाणे शहर ने रायगडला ३४-२८ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती.

# जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय खारेगाव येथे स्थलांतरित

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, ठाणे :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अतंर्गत असलेले ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय नवी मुंबईतील कोकण भवन येथे होते. आता हे कार्यालय, खारेगाव- कळवा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, दत्तवाडी बस स्टॉप जवळ, खारेगांव कळवा, ठाणे, पिन कोड ४००६०५ येथे नवीन जागेत स्थालांतरित झाले आहे. जात दाव्यासंदर्भात अर्जदारांनी कार्यालयाच्या नवीन पत्त्यावर संपर्क साधावा, तसेच नविन अर्जदारांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी बाबतचे प्रस्ताव विहित नमुन्यात ऑनलाईन तसेच मूळ प्रत विहित कालावधीत उपरोक्त नवीन पत्त्यावरील कार्यालयात समक्ष जमा करावे, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य वाजे व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव प्रसाद खैरनार यांनी केले आहे.

# पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ कल्याण यांच्या गुन्हेगारी नियंत्रण व जनजागृतीत सरस कामगिरीचा आढावा

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०२, कल्याण (ठाणे) :** पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, कल्याण यांनी २०२४ मधील गुन्हेगारीविरोधी कारवाई, जनहितासाठी घेतलेले उपक्रम आणि आगामी योजना जाहीर केल्या आहेत. यामध्ये गुन्ह्यांची उघडकीस येण्याची उच्च टक्केवारी, जनजागृती मोहिमा, आणि महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष प्रयत्न यांचा समावेश आहे.

**गुन्हेगारीविरोधी कामगिरी पुढील प्रमाणे :**

भाग १ ते ५ गुन्ह्यांचा तपशील:

२०२४: ३०४४ गुन्हे दाखल; ७८% प्रकरणे उघडकीस.

२०२३: ३०९३ गुन्हे दाखल; ८०% प्रकरणे उघडकीस.

**भाग ६ गुन्ह्यांवर कारवाई:**

५३८५ प्रकरणांपैकी ९६% प्रकरणांचा तपास यशस्वी.

शस्त्र कायदे व एनडीपीएस कायद्यात ठोस कार्यवाही.

**दारूबंदी:**

४८७ प्रकरणे दाखल; २२ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत.



तुलनेत २०२३पेक्षा १८३ प्रकरणांची वाढ.

एनडीपीएस कारवाई:

३६ गुन्हे दाखल; ५१ लाख रुपयांचे अंमली पदार्थ जप्त.

**महिला सुरक्षेत पुढाकार:**

बलात्कार, विनयभंग व इतर प्रकरणांमध्ये ६८३ गुन्हे दाखल; ९७% तपास पूर्ण.

महिलांच्या तक्रारींवर जलद प्रतिसाद.

**चेन स्नॅचिंग:**

३९ प्रकरणांपैकी ३८ उघड; १३.८० लाख रुपयांचा मुद्देमाल परत.

**वाहन चोरी:**

३३६ प्रकरणांपैकी १३४ प्रकरणांत गुन्ह्यांची उकल.

मोक्का व एमपीडीए कायद्यांची अंमलबजावणी:

संघटित गुन्हेगारीवर ५ प्रस्ताव मंजूर.

एमपीडीएअंतर्गत ४ जणांवर स्थानबद्धता कारवाई.

**महत्वाचे जनहित उपक्रम**

रेझिंग डे सप्ताह (२ जानेवारी २०२५ - ८ जानेवारी २०२५):

महिला सुरक्षा, बाल शोषण, सायबर गुन्हे आणि वाहतूक सुरक्षितता विषयांवर जनजागृती.

नशामुक्ती मोहिमांचे आयोजन.

**शालेय-कॉलेज कार्यक्रम:**

३२८ शाळांमध्ये गुड टच-बॅड टच व सायबर सुरक्षा या विषयांवर मार्गदर्शन.

४०७ जनजागृती सत्रांचे आयोजन.

**मुद्देमाल परतावा:**

वर्षभरात १.५१ कोटी रुपये किमतीचा मुद्देमाल मूळ मालकांना परत.

७ जानेवारी २०२५ रोजी १.३२ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तांतरित होणार.

**पोलीस मित्र योजनेत वाढ:**

७९५ पोलीस मित्रांची गणेशोत्सव, नवरात्र, निवडणुकीसारख्या उपक्रमांत प्रभावी भूमिका.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांनी या कामगिरीचे श्रेय पोलीस दलाच्या संघटित प्रयत्नांना दिले असून जनतेला या कामगिरीत सहकार्य व विश्वास कायम ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# प्राथमिक शिक्षण विभागाचे स्थलांतर वागळे इस्टेट येथील कार्यालयात

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१, ठाणे :** जिल्हा परिषद ठाणे ग्रामीण भागातील शासकीय कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावत असते.

जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आणि शिक्षण विभागाचे कामकाज विस्तृत असल्याने योग्य तो समन्वय ठेवण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभाग वागळे इस्टेट येथे



भाडेतत्त्वावर घेतलेल्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आला आहे. तर कृषी विभाग आणि स्वच्छ भारत मिशन विभाग बी.जे. हायस्कूल येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

दि.३० डिसेंबर २०२४ रोजी प्राथमिक शिक्षण विभागाचे कामकाज स्केअर फिट होम्स, एसजी. बर्वे रोड, जिएसटी. भवन समोर, वागळे इस्टेट, एमआयडीसी, २२ नंबर सर्कल, ठाणे (प) येथील भाडेत्तत्वावर घेतलेल्या इमारतीत तर स्वच्छ भारत मिशन आणि कृषी विभाग बी. जे. हायस्कूल टेंबीनाका,

वाडीया रुग्णालय जवळ, ठाणे (प) येथे स्थलांतरित करण्यात आले असल्याने ठाणे जिल्ह्यातील सर्व संबंधित यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

# कळंब तालुक्यात ग्रामपंचायत अतिक्रमण मुक्त अधिनियम आहेत तरी कश्यासाठी ??

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, धाराशिव :** कळंब तालुक्यातील मस्सा खं येथील महाराष्ट्र शासन सिटी सर्वे १९८ मध्ये १२८.५० चौ मी जागा आहे.ती जागा मुस्लिम समाजाच्या वक्फ बोर्ड च्या गॅजेट प्रमाणे ग्रामपंचायत च्या नमुना नं आठ अ ला नोंद असलेल्या जागेवर अतिक्रमण करून घरकुल बांधकाम करत असल्याची तक्रार गट विकास अधिकारी पंचायत समिती कळंब यांच्याकडे कय्युम उमर शेख व बांधवानी केली होती.

मस्सा खं येथील एका महिला लाभार्थ्याला प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल मंजूर झाले आहे. घरकुल विभाग पंचायत समिती कळंब यांनी प्रस्ताव मगवून बांधकाम करण्यासाठी मार्कआउट ही दिले .परंतु त्याने स्वतः च्या नावे १७÷७५ नोंद असलेली सी टी सर्वे नंबर २०१ या जागेत व ग्रामपंचायत आठअ



नक्कले नुसार बांधकाम न करता गावठाण च्या जागेमध्ये अतिक्रमण करुन घरकुल बांधकाम करत असल्याची तक्रार केली होती, या प्रकारणात गटविकासअधिकारी आर. व्ही चकोर यांनी सुनवानी घेत घरकुल लाभधारक,व ग्रामविकास अधिकारी, सरपंच व तक्रारदार यांच्या समक्ष सुनावणी घेऊन, लाभार्थ्यांने भूमी अधीक्षक कळंब यांच्या कडून चतुसीमा व मोजणी करून घेऊन आठ्ठ दिवसात कागद पत्र सादर करावी असे आदेश दिले.व भूमी अधीक्षक यांच्या कडून मोजणी होत नाही तो पर्यंत बांधकाम करू नये असे सांगितले होते,परंतु या आदेशला न जुमनात बांधकाम सुरूच ठेवले आहे.

याबाबत कय्युम शेख यांनी दिनांक २०/५/२०२४ रोजी अमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता. यावेळी ग्रामविकास अधिकारी ए बी वाघमारे व सरपंच त्रिंबक कचरे यांनी यापुढे बांधकाम केल्यास त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करू असे लेखी दिले होते. परंतु त्याच्यावर कसलीच कारवाई न करता त्याने बांधकाम पूर्ण केले व चालूच आहे. यामुळे त्याची कसून चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी ,

तसेच अतिक्रमणाचे जे काही अधिनियम असतील त्या अधिनियमानुसार कारवाई करावी म्हणून गटविकास अधिकारी कार्यालया समोर पुन्हा आमरण उपोषण सुरू केले आहे दिनांक १/१/२०२५ रोजी पासून गटविकास अधीकारी यांच्या दालना समोर अमरण उपोषण करत आहेत. त्यांचा आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे . कय्युम उमर शेख, अलीम तांबोळी, इसाक शेख,शारुख पठाण, इकबाल शेख, अहमद शेख, हाजूमिया शेख, हमीद तांबोळी, असिफ पठाण, समीर पठाण इ उपोषण करत आहेत.

# धुळे जिल्ह्यात वर्षभरात ४०८ जणांची आत्महत्या !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, धुळे :** २०२४ या वर्षभरात धुळे जिल्ह्यात ४०८ जणांनी आत्महत्या केल्या. त्यात सर्वाधिक ८२ टक्के पुरुषांचा समावेश असून १३४ जणांनी मानसिक तणावामुळे आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी २०२४ या वर्षात जिल्ह्यातील पोलीस ठाणेनिहाय आत्महत्या आणि आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दाखल झालेल्या नोंदींचे विश्लेषण केले.

धुळे जिल्ह्यात झालेल्या ४०८ जणांच्या आत्महत्येच्या पोलीस ठाणेनिहाय नोंदी धुळे शहर ५३, धुळे आणि साक्री विभाग १६४, शिंदखेडा आणि शिरपूर विभाग १९१ याप्रमाणे आहेत. सर्वाधिक ८२ टक्के संख्या पुरुषांची आहे. आत्महत्या केलेल्यांमध्ये ३३५ पुरुष आणि ७३ स्त्रियांचा समावेश असून विवाहित पुरुषांची २६० तर, स्त्रियांची संख्या ५० आहे. आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली २५ गुन्हे दाखल आहेत. १३४



जणांनी मानसिक तणावामुळे, ९० जणांनी व्यसनांमुळे तर, ८५ जणांनी कौटुंबिक कलहातून आत्महत्या केली. या आत्महत्या रोखण्याजोग्या होत्या, असा प्राथमिक निष्कर्षही पोलीस अधिकाऱ्यांनी काढला आहे. आत्महत्या कशा थांबविता येतील, यासंदर्भात मनोविकारतज्ज्ञ डॉ. जगदीश गिंदोडिया यांनी माहिती दिली. एखादी व्यक्ती तणावग्रस्त आणि उदासीन असल्याचे लक्षात येताच समुपदेशन होणे गरजेचे आहे. यामुळे आत्महत्या करणाऱ्यांची संख्या आपण नक्कीच कमी करू शकतो. आपल्या आजूबाजूला अशा अनेक घटना घडतात. विशेषत: महिलांमध्ये उदासीनता आणि निराशपणा मोठ्या प्रमाणात असते. मन मोकळे करण्यासाठी त्यांना जागाच नसते, असे बहुतेक वेळा लक्षात आले आहे. यामुळे त्या मानसिक तणावात राहतात. अशा महिलांचे योग्य समुपदेशन करण्याची गरज डॉ. गिंदोडिया यांनी मांडली.

मनोविकार जडलेल्या बेवारस महिला आणि पुरुषांवर उपचार आणि पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या स्नेहदीप फाउंडेशनच्या संस्थापक, संचालिका भाग्यश्री कुलकर्णी यांनी, मानसिक तणावातून मनोधैर्य खचते आणि मानसिक संतुलनही बिघडत असल्याने अनेकजण अप्रिय घटनांकडे वळतात, असे नमूद केले. मानसिक तणावात असलेले अनेक जण दवाखान्यात उपचार घेणे टाळतात. कुटूंबातील ज्येष्ठ व्यक्तीही त्यांना मनोविकार तज्ज्ञांकडे उपचारासाठी नेत नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आत्महत्यांची कारणे

कोणत्या कारणांमुळे किती आत्महत्या झाल्या, याची नोंदही धुळे जिल्हा पोलिसांनी केली आहे. त्यानुसार मानसिक ताण आणि नैराश्य १३४, मद्याचे अतीप्राशन ९०, कौटुंबिक वाद ८५, आजारपण ४२, कर्जबाजारी १८, रागाच्या भरात १७, शेतमाल नुकसान ७, शैक्षणिक नुकसान ६, प्रेमभंग ५, लग्न न जमणे ४ याप्रमाणे वर्षभरात ४०८ जणांनी आत्महत्या केली आहे.

# थोडक्यात

## खोपोली नगरपरिषदेच्या ३ कर्मचाऱ्यांची सफाई कामगार पदावरती नियुक्त्या

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.०१, खोपोली (रायगड) :** खोपोली नगर परिषद मध्ये कै.सुधाकर दामु जाधव, कै.हरिभाऊ गोविंद शिंदे व अशोक गणपत पवार हे सफाई कामगार या पदावर कार्यरत होते. अशोक गणपत पवार हे नगर परिषद सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच कै.सुधाकर दामु जाधव, कै.हरिभाऊ गोविंद शिंदे हे सेवेत असतांना मृत्यू पावलेले आहेत. शासन धोरणानुसार व लाड समितीच्या शिफारशीनुसार संबंधित सफाई कामगारांच्या जागी त्यांच्या वारसाची नियमानुसार सफाई कामगार या पदावर नियुक्ती देण्यात येते. त्यानुसार खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांनी दि.०१ जानेवारी २०२५ रोजी कर्मचारी यांच्या वारस अमित अशोक पवार, राज हरिभाऊ शिंदे व लवकेश सुधाकर जाधव यांना वारसाहक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती दिली. यावेळी खोपोली नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी रणजित पवार हे उपस्थित होते. या नियुक्तीबाबत कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांचे आभार मानले.

## नेरुळ विभागात पाडकामाची कारवाई



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, नेरुळ (नवी मुंबई) :** उच्च न्यायालयाचे वेळोवेळी आदेशानुसार नवी मुंबई महानगर पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊन ही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ.राहुल गेठे अतिरिक्त आयुक्त (२) यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत १) श्रीमंत हजारे, एनएल-१, बी-१६/१५, से.१०, नेरूळ, नवी मुंबई, २) गंगाराम देशमुख, एनएल१, ए-६/४, से.१०, नेरूळ, नवी मुंबई, यांचे सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे ३.५०मी ÷ ७.२०मी मोजमापाचे जी+४ आरसीसी बांधकाम अनधिकृतरित्या करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये दि.१०/१२/२०२४ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापि, नोटीसीची मुदत संपुष्टात येऊन ही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

## मोठागाव - माणकोली उड्डाणपुलावर टवाळखोर, तळीरामांना पोलिसांचा दणका

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.०२, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पश्चिमेकडील मोठा गाव माणकोली उड्डाणपुलावर नशेखोर आणि दारुडेबसत असल्याने पोलिसांनी तात्काळ कारवाई करावी. अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दीपेश म्हात्रे यांनी पोलीस उपायुक्त यांना निवेदन देत केली. विष्णूनगर पोलीसांनी दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी पुलावर कारवाई केली. मोठागाव - माणकोली उड्डाणपुल सध्या चर्चेचा विषय बनला आहे. या पुलावर अंधारात मुले - मुली बसत असून काही मुले दारुड्या बाटल्या घेऊन बिनदास्तपणे पित असतात. अंधाराचा फायदा घेऊन कोणताही अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विष्णूनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार यांनी यांचे गंभीर्य ओळखून कारवाई केली. दिनांक २३ डिसेंबर २०२४ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पवार व पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर पुलावर जाऊन टवाळ मुलांना हाकलून दिले. तसेच जे मुले - मुली बसले होते. त्यांना पुलावर बसू नका असे सांगत जाण्यास सांगितले. याबाबत वपोनि पवार म्हणाले, डोंबिवली पश्चिमेला सर्वच ठिकाणी पोलिसांची गस्ती असते. मोठा गाव माणकोली उड्डाणपुलावर पोलीस गस्त असते.

## मा.आ.प्रदीप नाईक यांच्या निधनामुळे बंजारा समाज पोरका झाला - प्रशांत राठोड

**अक्षराज : कैलास राठोड**



**दि.०२, किनवट (नांदेड) :** किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाचे सलग १५ वर्षे प्रतिनिधित्व करणारे बंजारा समाजाचे ज्येष्ठ नेते आणि आमचे मार्गदर्शक स्वर्गीय प्रदीप नाईक यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले असून त्यांच्या निधनामुळे बंजारा समाज पोरका झाला आहे असे प्रशांत राठोड कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांनी म्हटले आहे. या संदर्भात अधिक माहिती देताना प्रशांत राठोड म्हणाले की, किनवट माहूर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी माजी आमदार प्रदीप नाईक यांनी आपले आयुष्य वेचले होते. या मतदारसंघात वाडी वस्ती आणि आदिवासी बांधवांचे पाड जास्त प्रमाणात आहेत. अनेक वर्षापासून या भागात रस्ते, पाणी आरोग्याची सुविधा नव्हती होती. परंतु प्रदीप नाईक हे जेव्हापासून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीत होते तेव्हापासून प्रत्येक तांड्यात वाडी, वस्ती आणि पाडावर रस्ता पाण्याची व्यवस्था आणि आरोग्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती. माजी आमदार प्रदीप नाईक साहेब हे यांच्या आकस्मित निधनामुळे किनवट माहूर विधानसभा मतदारसंघातील आणि राज्यातील बंजारा समाजाचा फार मोठी हाणी झाली असून बंजारा समाजाचा एक लढवय्या नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. स्व.प्रदीप नाईक यांच्या परिवाराच्या दु:खात आम्ही सर्व बंजारा समाज बांधव सहभागी आहोत असे शेवटी प्रशांत राठोड कक्ष अधिकारी, मंत्रालय, मुंबई यांनी म्हटले आहे.